# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक [02482]-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

**E-mail. rdcjalna@gmail.com , jalnaddmo@gmail.com Website:- www.jalna.nic.in , http://59.90.142.57/ddmajalna**


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि-

दिनांक २७/०३/२०२०

**वाचा:**१. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०, ३१, ३४, ४१ व कलम ५१.

२. महाराष्ट्र शासन क्रमांक करोना २०२०/प्रा.क्र.५८/आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०.

३. अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक १४ मार्च, २०२०.

४. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ च्या बाबतचे पत्र दिनांक १३ मार्च २०२०.

५. महाराष्ट्र शासन क्रमांक करोना २०२०/प्रा.क्र.५८/आरोग्य ५ दिनांक १५ मार्च, २०२०.

६. या कार्यालयाचे आदेश जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि-दिनांक २६, मार्च २०२०.

## आदेश

राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आली असून स्वातंत्र्यरित्या निर्गमित करण्यात येत आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. ६ अन्वये करोना विषाणूचा राज्यात वाढता प्रादुर्भा लक्षात घेता फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये मनाई आदेशाचे परिच्छेद क्र. ६ मधील नमुद सुचनांच्या आधिन राहून दि.२५ मार्च,२०२० रोजी पासून ते दि.१४ एप्रील २०२० चे मध्यरात्री २४.०० वा. पर्यंत नागरी, ग्रामीण व औद्योगिक क्षेत्रात जमावबंदी आदेश लागू केलेला आहे.

त्याअर्थी साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीमधील तरतुदीनुसार गर्दी टाळण्यासाठी तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ वे कलम १४४(१) (३) अन्वये मनाई आदेशाचे उल्लंघन होवू नये या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपायायोजना म्हणून **मी रविंद्र बिनवडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना** जिल्हयातील पुढील आदेश पारीत करीत आहे.

जिल्हयात जमावबंदीच्या उक्त कालावधीमध्ये संदर्भीय आदेश क्र.७ मधील अत्यावश्यक सेवा देणारे वाहने (पिण्याचे पाणी पुरवठा, सांड पाणी, निचरा व्यवस्थापन, रुग्णालये, पॅथॉलॉजी, लॅबोरेटरी, सर्व प्रकारचे दवाखाणे, वैद्यकीय महाविद्यालय, किराणा सामान दुकानदार, खाद्य तेल, अन्न धान्य, दुध/दुग्ध उत्पादने, फळे, भाजीपालाचे वाहन, गॅस औषधालये, अत्यावश्यक सेवा देणारे शासकीय कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कर्मचारी, श्ववाहिका) व सक्षम अधिकारी यांनी परवाना दिलेली वाहने यांना पेट्रोल पंप चालकांनी इंधन पुरवठा करावा. तसेच जमाव बंदी कालावधी मध्ये इतर सर्व खाजगी वाहनांना पेट्रोल पंप चालकांनी इंधन पुरवठा करु नये. तसेच खाजगी टुव्हीलर व फोर व्हिलर धारकांना जमाव बंदीच्या कालावधीमध्ये रस्त्यावर फिरण्यास सक्त बंदी/मनाई करण्यात येत आहे.

उपरोक्त आदेशाचे उल्लंघन करणा-या कोणत्याही व्यक्तीने अथवा संस्थेने भारतीय दंडसंहिता १८६० चे कलम १८८ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ च्या कलम ५१ अन्वये शिक्षेसपात्र असलेला अपराध केला असे माणण्यात येईल आणि इतर कलमांसह दिवणी व फौजदारी कार्यवाही करण्यात येईल.

Raut

**(रविंद्र बिनवडे)** भा.प्र.से.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**

27/3/2020

जिल्हाधिकारी कार्यालय जालना

**प्रति:**

१- सर्व विभाग प्रमुख, जिल्हा जालना.

२- पोलीस अधीक्षक, जालना यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

३- जिल्हा माहिती अधिकारी, माहिती कार्यालय,जालना यांना प्रसिध्दीस्तव.

४- सर्व संबंधीत पेट्रोल पंप चालक जि.जालना (मार्फत संबंधीत तहसीलदार जि.जालना)

**प्रत:** (माहितीस्तव)

१. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.